नवप्रभा शनिवार, दि. १२ डिसेंबर २०१५

नवप्रभा : 12/12/2015

» केर-दोडामार्ग येथे एनएसएस शिबिर उत्साहात

# तरुणांनी निर्व्यसनी रहावे : शिंदे

दोडामार्ग (न. प्र.)

आगामी काळातील स्पर्धेत यशस्वी व्हायचे असेल व अब्दुल कलामांच्या स्वप्नातील भारत घडवायचा असेल तर तरुणांनी निर्व्यसनी राहण्याची, सर्वांगीण विकास साधताना वेळेची किंमत जाणण्याची व परिश्रम घेण्याची गरज आहे. नकारात्मक विचारांना वर्ज्य करून सकारात्मक गोष्टी अंगीकृत केल्या तर देशाचे उज्ज्वल भविष्य तरुणांच्या हातून घडेल, असे उद्गार सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक दत्तात्रय शिंदे यांनी काढले. केर-दोडामार्ग येथे मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभाग व लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालय दोडामार्ग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सात दिवशीय विद्यापीठस्तरीय एनएसएस विशेष निवास शिबिराच्या समारोप समारंभात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी भूषविले.

यावेळी व्यासपीठावर केर-भेकुर्लीचे सरपंच प्रेमानंद देसाई, नवनिर्माण शिक्षण संस्थेचे सदस्य सूर्यकांत परमेकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. आर. ए. मोरे व डॉ. एस. यू. दरेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सहभागी शिबिरार्थींना श्री. शिंदे मार्गदर्शन करत होते. याप्रसंगी सरपंच देसाई यांनी शिबिर कालावधीत आलेले अनुभव व्यक्त केले. तसेच उपस्थितांना ग्रामपंचायतीच्या विकास कामांची माहिती दिली. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. पाटील यांनी स्वयंसेवकांना शिबिर कालावधीत मिळालेले ज्ञान व अनुभव आचरणात आणण्याचे व पर्यावरण संवर्धनात पुढाकार घेण्याचे आवाहन केले.

समारोप समारंभात शिबिरादरम्यान घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमधील विजेत्यांना पारितोषिके व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. सरपंच देसाई यांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना त्यांना छ. शिवाजी महाराजांचे तैलचित्र देऊन महाविद्यालयातर्फे सन्मानित करण्यात आले. या समारंभात प्रातिनिधीक स्वरूपात तीन स्वयंसेवकांनी आपले मनोगत व्यक्त केले.

प्रारंभी राष्ट्रीय सेवा योजना गीताने सांगता समारोहाची सुरूवात करण्यात आली. प्राचार्य डॉ. पाटील यांनी स्वागत केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यामध्ये प्रा. मोरे, प्रा. डॉ. दरेकर, प्रा. कदम, व प्रा. देसाई यांनी परिश्रम घेतले. मुंबई विद्यापीठाच्या स्थापना झाल्यानंतरच्या १५० वर्षांच्या इतिहासात प्रथमच जिल्ह्यातील आयोजित केलेले राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवशीय शिबिर केर ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे व स्वयंसेवकांच्या शिस्तीमुळे कमालीचे यशस्वी झाले, अशी भावना सर्वांनीच व्यक्त केली. सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. सोपान जाधव यांनी केले. आभार प्रा. मोरे यांनी मानले.